MHAU100009052023

## नि. दि. दा. क्र.९२/२०२३ मधील नि.क्र.५ खालील आदेश

*(इंदुबाई विरुद्ध कचरु व इतर)*

०१. प्रस्तुतचा ई–सेवा नुसार अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींना दावा मिळकत म्हणजेच मौजे गंधेश्वर, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद येथील गट क्र. ५० मधील २ गुंठे क्षेत्र, मध्ये वादीच्या प्रतिवादी यांनी बांध फोडुन रस्ता प्रस्थापित करु नये किंवा त्याच्या ताब्यास हरकत अडथळा निर्माण करु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरिता दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी हे प्रस्तुत दाव्यात हजर झाले, परंतु पुरेशी संधी देवुन सुध्दा त्यांनी त्यांचे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणणे विना गुण दोषावर निकाली काढण्यासाठी घेतलेला आहे.

०३. वादीतर्फे वकील श्री. डी. पी. काळे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींकडुन युक्तीवादाकरिता कोणीही आले नाही म्हणुन प्रतिवादींच्या युक्तीवादाविना दावा पुढे चालविण्यात आला.

०४. खालील मुद्दे माझ्या पडताळणीस उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष

Scanned with OKEN Scanner

व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | काय वादी तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत ? | होय. |
| २. | काय हुकूम ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ व २ करिता –**

०५. तूर्तातूत मनाई अर्जाचा विचार करतेवेळी वादीला सकृतदर्शी केस आहे काय, न्यायाचा तराजु कोणाच्या बाजुने आहे तसेच अर्ज मंजुर केल्यास नुकसान कोणाचे होईल या बाबी पाहाव्या लागतात.

०६. वादीने तिच्या प्रस्तुतच्या अर्जामध्ये कथन केले की, वाद मिळकत ही तिच्या मालकीची असुन प्रतिवादींची मिळकत वादीच्या दक्षिणेस असुन प्रतिवादी यांचा दावा मिळकतीसोबत कोणताही संबंध नसताना प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. वादीची दावा मिळकतीवरील मालकी व ताबा दाखवण्यासाठी वादीने निशाणी क्र. ४ वरील दस्त यादीसोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा व फेरफार नोंद क्रमांक ७७ ची प्रत दाखल केली. सदर महसुली अभिलेखास महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमाचे कलम १५७ नुसार गृहीतके आहेत. सदर ७/१२ व फेरफार नोंदींच्या अवलोकनावरुन प्रथमदर्शनीय वादीचा दावा मिळकतीवर ताबा व हक्क दिसुन येत आहे.

Scanned with OKEN Scanner

उलटपक्षी, प्रतिवादी यांनी उपरोक्त वादीचे कथन नाकारण्यासाठी किंवा त्यांचा दावा मिळकतीसोबत त्यांचा संबंध दाखवण्यासाठी किंवाा त्यांचा दावा मिळकतीमध्ये रस्ता आहे हे दाखवण्यासाठी कुठलेही कथन प्रस्तुत प्रकरणात केले नाही किंवा तसा पुरावा देखील अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा प्रथमदर्शनीय दावा मिळकतीसोबत संबंध असल्याचे दिसुन येत नाही. त्यामध्ये वादीचे हितामध्ये प्रथमदर्शनी केस सिध्द होतांना दिसुन येत आहे.

०७. याव्यतिरीक्त दिनांक २४/०९/२०२३ रोजीच्या वादींच्या ताब्यास हरकत अडथळा होत असल्याबाबतचे कथन सुध्दा प्रतिवादी यांनी आव्हानीत झालेले नाही. त्यामुळे प्रथमदर्शनीय वादीच्या दावा मिळकतीवरील ताब्यास प्रतिवादींकडुन अडथळा निर्माण होत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादींचे हितामध्ये मनाई हुकूमाचा आदेश पारित न केल्यास वादींचे कधीही न भरुन येणार नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे न्यायाचे तौलानीक तराजु सुध्दा वादीचे बाजुने झुकताना दिसुन येत आहे. त्यामुळे वादीं हे तात्पुरता मनाई अनुतोष मिळण्यास पात्र आहे. परिणामी मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होय असा नोंदवित असून मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **–:: आदेश ::–**

०१ प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.५ मंजूर करण्यात येत आहे.

०२ प्रतिवादी यांनी किंवा तर्फे इसम यांनी दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जे

Scanned with OKEN Scanner

*नि.दि.दा. क्र. १२/२०२३*

***नि.क्र. ५ खाली आदेश***

वहिवाटीस हरकत अडथळा करू नये किंवा दावा मिळकतीमध्ये रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करू नये असा तात्पुरता मनाई आदेश दाव्याच्या निकालापावेतो देण्यात येत आहे.

०३ खर्चाचा हुकूम अंतिम निकालाच्या वेळी केला जाईल

दिनांकः– १४/०२/२०२४

**(व्ही. एच. खेडकर)**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
खुलताबाद

Scanned with OKEN Scanner